L. A. BILL No. 2017.

# A BILL

# TO PROVIDE FOR THE PROCEDURE OF THE BOUDHA MARRIAGE *(MANGAL PARINAY)* AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.

## सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक .

बौद्ध धर्मांचा पालन करणाऱ्या व्यक्तींमधील बौद्ध विवाह (मंगल परिणय) याची रीत विहीत करणेबाबत आणि त्या सबंधित इतर तदानुषांगिक बाबींसाठी विधेयक.

**ज्याअर्थी,** राज्यामध्ये पारंपारिक बौद्धांचा निवास आहे;

**आणि ज्याअर्थी,** पारंपारिक बौद्धांची विवाह पद्धती प्राचीन काळापासून प्रचलित आहे;

**आणि ज्याअर्थी,** १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, दिक्षा भूमी, नागपूर येथे बौद्ध धम्माच स्विकार करून त्यांच्या अनुयायाना धम्म दिक्षा दिली;

**आणि ज्याअर्थी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी बौद्ध धम्माच स्विकार करून धर्मांतरित बौद्ध झालेत;

**आणि ज्याअर्थी,** श्री. विष्णु कर्डक, ४१-२, ३ री मरीन स्ट्रीट, मुंबई-४०० ००२ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिनांक १२ नोव्हेंबर १९५६ रोजी बौद्ध विवाह पद्धतीबद्दल लिहिलेल्या पत्राला ४.१२.१९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना बौद्ध विवाहाची अशी पद्धत पत्राद्वारे कळविली होती;

**आणि ज्याअर्थी,** नवव्या विधी आयोगाने बौद्ध धर्मियांसाठी वेगळा विवाह कायदा असणे आवश्यक आहे अशी शिफारस शासनास केली होती;

**आणि ज्याअर्थी,** बेबी विरूद्ध जयंत (क्रिमिनल अपील क्र. ८१५/१९७९) या प्रकरणात निकाल देताना सदर न्यायनिर्णयामध्ये मा. न्यायमूर्तींनी बौद्ध विवाह पद्धती विषद करून त्यास कायदेशीर स्वरूप देण्यात यावे असे निदेश शासनास दिले होते;

**आणि ज्याअर्थी,** समाजातील विविध सामाजिक आणि धार्मिक संघटना तसेच समाजातील विविध स्तरातील विचारवंत, साहित्यिक आणि राज्यातील विविध घटकांकडून बौद्ध विवाहास कायदेशीर मान्यता देवून सर्व विवाह वैद्द ठरविण्यात यावे याबाबत निरंतर शासनास विनंती करण्यात येत आहे;

**आणि ज्याअर्थी,** बौद्ध धर्माचे पालन करणाऱ्या बौद्धांमधील व्यक्तींच्या विवाहास कायदेशीर मान्यता मिळणेबाबत योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी,** खालील अधिनियम करण्यात येत आहे:-

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रांरभ. १. (१) या अधिनियमास, बौद्ध विवाह (मंगल परिणय) अधिनियम, २०१७, असे म्हणावे.

(२) हा अधिनियम महाराष्ट्र राज्यातील बौद्धांना लागू होईल.

(३) हा अधिनियम महाराष्ट्र शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, अंमलात येईल.

व्याख्या. २. (१) या अधिनियमाच्या अर्थाच्या विरुद्ध नसेल तर, किंवा संदर्भाच्या विरुद्ध नसेल तर,

(१) "बौद्ध विवाह (मंगल परिणय)" म्हणजे असा बौद्ध विवाह (मंगल परिणय) किंवा मंगल परिणय जो पारंपारिक बौद्ध आणि धर्मांतरित बौद्ध आणि बौद्ध असलेल्या दारक आणि दारिका यांच्यात, परिशिष्ट दोन प्रमाणे घोषणा करून, या अधिनियमानुसार संपन्न झालेला बौद्ध विवाह.

(२) "पारंपारिक बौद्ध" याचा अर्थ दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ या दिवसापूर्वी आस्तित्वात असलेले मूळ बौद्ध व्यक्ती किंवा त्यांचे वंशज.

(३) "धर्मांतरित बौद्ध" याचा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दिक्षाभूमी, नागपूर येथे धम्म

प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित समारंभात धम्म दिक्षा घेतलेल्या व्यक्ती किंवा त्यांचे वंशज, आणि त्यानंतर वेळोवेळी ज्या व्यक्तीने याप्रमाणे धम्म दिक्षा घेतलेली असेल असे व्यक्ती होय.

स्पष्टीकरण :-

यामध्ये १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दिक्षाभूमी, नागपूर येथे अशा पद्धतीने धम्म दिक्षा घेतलेले,

(अ) अनुसूचित जाती संवर्गातील सर्व घटक; आणि

(ब) अनुसूचित जाती व्यतिरिक्त इतर प्रवर्गातील असे घटक

जे बौद्ध धर्माचे आणि त्याच्या रितीरिवाजाचे पालन करतात, यांचा समावेश होतो.

(४) "बौद्ध" म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला व बौद्ध धम्माचे आचरण करणारा, धम्माचे पालन करणारा व बौद्ध परंपरेनुसार आणि चालीरितीप्रमाणे जगणारा धर्मांतरित बौद्ध असून यात बौद्ध भिख्खू, श्रामनेर, बौद्धाचार्य, उपासक, उपासिका यांचा समावेश असून, यात धम्माचे पालन करणारा बौद्ध यांचा पण समावेश होतो.

(५) "भिख्खू" याचा अर्थ असा प्रौढ बौद्ध व्यक्ती ज्याने बौद्ध धर्माप्रमाणे उपसंपदा घेतलेली आहे.

(६) "उपासक किंवा उपासिका" याचा अर्थ बौद्ध धर्माचे अनुपालन करणारे व्यक्ती.

(७) "संस्कार विधी" म्हणजे परिशिष्ट-पाच मध्ये नमूद केलेले विधी.

(८) "विहार" याचा अर्थ बौद्धांनी एकत्रित येवून या अधिनियमात नमूद बौद्ध वंदना करण्याची जागा, वास्तू किंवा स्थळ होय.

(९) "निबंधक" म्हणजे या राज्यात संपन्न होणारे विवाह नोंदणी करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने नेमलेला अधिकारी.

(१०) "बौद्ध विवाह (मंगल परिणय) याचे प्रमाणपत्र" याचा अर्थ या अधिनियमान्वये संपन्न झालेल्या बौद्ध विवाहाचे (मंगल परिणयाचे) परिशिष्ट क्रमांक चार प्रमाणे दिलेले प्रमाणपत्र बौद्ध.

(११) "विहित" म्हणजे या अधिनियमाअंतर्गत विहित केलेले नियम.

(१२) "महाराष्ट्र राज्य" म्हणजे महाराष्ट्र राज्य किंवा महाराष्ट्र शासन.

(१३) "नियम" याचा अर्थ या अधिनियमांतर्गत केलेले नियम.

(१४) "दारक" याचा अर्थ या अधिनियमानुसार प्रस्तावित बौद्ध विवाह (मंगल परिणय) करण्यास इच्छूक असलेला २१ वर्षापेक्षा कमी नाही असा प्रौढ बौद्ध मुलगा किंवा पुरुष किंवा वर.

(१५) "दारिका" याचा अर्थ या अधिनियमानुसार प्रस्तावित बौद्ध विवाह (मंगल परिणय) करण्यास इच्छूक असलेली १८ वर्षापेक्षा कमी नाही अशी प्रौढ बौद्ध मुलगी किंवा स्त्री किंवा वधू.

(१६) "परिशिष्ट" म्हणजे या अधिनियमाला जोडलेले परिशिष्ट.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु, व्याख्या न केलेल शब्द व शब्दप्रयोग यांना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले व पिपल्स एज्यूकेशन सोसायटी, मुंबई यांनी प्रकाशित केलेले भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथात नमूद केलेले असतील आणि तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पुस्तकांमध्ये जे अर्थ असतील, तेच अर्थ असतील.

प्रतिबंधित नाती ३. या अधिनियमात परिशिष्ट एक मध्ये नमूद नाती या प्रतिबंधित नाती असतील.

सपिंड संबंध. ४. सपिंड संबंध म्हणजे,-

(अ) कोणत्याही बौद्ध मातेच्या मार्फत तिसऱ्या पिढीपर्यंत (तिसरी पिढी समाविष्ट करून) व पित्यामार्फत पाचव्या पिढीपर्यंत (पाचवी

पिढी समाविष्ट करुन) चे नाते. हे नाते संबंधित बौद्धापासून मोजले जाईल व संबंधित बौद्धांची ही पहिली पिढी असेल.

(ब) दोन बौद्धापैकी जर एक बौद्ध दुसऱ्याची सपिंड नात्यांच्या मर्यादेमध्ये वंशज असेल किंवा त्या दोघांचे सपिंड नात्यामध्ये सामायिक पूर्वज असतील तर ते एकमेकांचे सपिंड असतात.

बौद्ध विवाह (मंगल परिणय) संपन्न करणे.

५. (१) या अधिनियमान्वये पारंपारिक बौद्ध, धर्मांतरित बौद्ध, बौद्ध किंवा बौद्ध धर्माचे पालन करणारी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती हे बौद्ध विवाह (मंगल परिणय) संपन्न करतील आणि परिशिष्ट तीन प्रमाणे नोंदणी करुन परिशिष्ट चार प्रमाणे बौद्ध विवाह (मंगल परिणय) याचे प्रमाणपत्र देतील.

परंतु, बौद्ध विवाह संपन्न करणारी व्यक्ती बौद्ध विवाहापूर्वी दारक किंवा दारिका या अधिनियमाच्या अटी व शर्ती पूर्ण करीत आहेत अशी खात्री करणार.

(२) असे प्रमाणपत्र निबंधक यांचेकडे नोंदणीकरिता सादर करण्यात येईल.

बौद्ध विवाह (मंगल परिणय) याच्या शर्ती.

६. दारक आणि दारिका यांना खालील शर्तीवर बौद्ध विवाह (मंगल परिणय) पार पाडता येईल :-

(१) मंगल परिणयाच्या वेळी दारक आणि दारिका,

(अ) यांची मानसिक स्थिती योग्य असावी.

(ब) ते बौद्ध विवाह (मंगल परिणय) याबद्धल निर्णय घ्यायला मानसिकदृष्टया सक्षम असावे.

(क) त्यांना वेडाचे झटके येत नसावे.

(ड) ते विवाहित नसावेत.

(इ) त्यांचा जर यापूर्वी विवाह झाला असेल तर असा विवाह सक्षम न्यायाधिकरणाने त्यांना विभक्त किंवा घटस्फोटीत केलेले असावे.

(२) दारक आणि दारिका यांचे परिशिष्ट एक प्रमाणे एकमेकांशी प्रतिबंधित नाते असता कामा नये.

(३) दारक आणि दारिका यांनी या अधिनियमाच्या अधिन राहून सर्व विधी संपन्न केल्या पाहिजेत.

(४) (१) दारक किंवा दारिका यापैंकी किंवा त्यांच्या परिवारातील कुठल्याही सदस्याला किंवा नातेवाईकाला किंवा मित्रांना किंवा आई-वडिलांना किंवा पालकांना बौद्ध विवाह करीता कसल्याही प्रकारचा हुंडा, द्रव्य किंवा मालमत्ता मागता येणार नाही, किंवा कुणालाही याबाबतीत प्रलोभन देता येणार नाही, किंवा प्रोत्साहन करता येणार नाही किंवा स्विकार करता येणार नाही.

(२) जर या कलमान्वये अशाप्रकारे कुणीही याबाबत वर्तन केल्यास तो गुन्हा ठरेल व अस्तित्वात असलेल्या कायद्यांप्रमाणे शिक्षेस पात्र असेल.

पुनर्विवाहास प्रतिबंध.

७. (१) या अधिनियमान्वये बौद्धास पुनर्विवाह प्रतिबंधित आहे.

परंतु, ज्यांनी यासंबंधात कायदेशीर फारकत घेतली असेल किंवा न्याय निर्णयाद्वारे एकमेकांपासून विलग झालेले असतील किंवा सक्षम न्यायालयाने त्यांना घटस्फोट दिला असेल तर त्याबाबतीत असा बौद्ध पुनर्विवाह करू शकतो.

(२) दारक किंवा दारिका यांपैकी कुणाचाही मृत्यू झाले असल्यास ते पुन:विवाह करू शकतात.

(३) या अधिनियमान्वये दारक किंवा दारिका यांच्यापैकी कुणीही बौद्ध धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मात धर्मांतरित होऊन विवाह केला असेल तर असा विवाह या अधिनियमान्वये झालेला बौद्ध विवाह मानण्यात येणार नाही.

इतर पद्धतीनुसार पार पाडलेल्या मंगल परिणयाची वैधता.

८. या अधिनियमात कोणत्याही तरतुदी असल्या तरीही बौद्धांमध्ये प्रचलित असलेल्या इतर कोणत्याही पद्धतीनुसार किंवा कुठल्याही नियमानुसार संपन्न झालेल्या कुठल्याही विवाहाच्या वैधतेवर परिणाम होत नाही.

बौद्ध विवाह (मंगल परिणय) याच्या पारंपारिक

९. मंगल परिणय अधिनियमातील किंवा इतर कोणत्याही अधिनियमातील तरतुदी किंवा पद्धती, रीती किंवा कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाविरूद्ध असले तरी सुद्धा ह्या कायद्याच्या पारित

पद्धतीनुसार मंगल परिणय वैध असणे

होण्याआधी किंवा कायदा पारित झाल्यानंतर बुद्धिष्ट असलेल्या दोन व्यक्तींमधील बुद्धिष्ट पद्धती व रीतीरिवाजाने पार पाडलेल्या मंगल परिणयाच्या वैधतेला केवळ तो बुद्धिष्ट पद्धतीने पार पाडला व मंगल परिणयाच्या पारंपारिक पद्धतीने पार पाडला नाही म्हणून बाधा येणार नाही.

बौद्ध विवाह (मंगल परिणय) संपन्न होण्याची रीत.

१०. (१) ज्या ठिकाणी मंगल परिणय पार पाडणारी व्यक्ती मंगल परिणयाचे धार्मिक विधी पार पाडते त्या ठिकाणाला "धम्म संस्कार मंच" असे म्हणतात.

(२) धम्म संस्कार मंचावर, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध यांच्या प्रतिमा किंवा पुतळे आणि तसेच मरुन रंगाचे कापड, एक टेबल, पाच फळे, बोधीवृक्षाची पाने, पाच मेणबत्त्या, अगरबत्ती, मातीचे भांडे पूर्ण पाणी भरून ठेवणे, पांढरा दोरा, दारक व दारिका यांच्यासाठी दोन पुष्पहार, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्धांना यांच्या प्रतिमाकरिता पुष्पहार किंवा पुतळयांकरिता फुले, असणे आवश्यक आहे.

(३) बौद्ध विवाह (मंगल परिणय) संपन्न करणाऱ्या बौद्धाने धम्म संस्कार मंचावरील टेबलावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध यांच्या प्रतिमा किंवा पुतळे टेबलाच्या मध्यभागी ठेवण्यात यावे, पुतळा किंवा फोटो यांच्या समोर पाणी भरुन मातीचे भांडी ठेवण्यात यावे, पांढऱ्या धाग्याची दोन टोके दारक व दारिका यांच्या हातात दिली जातील. पात्रामध्ये किंवा भांड्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची पाच फळे ठेवण्यात यावीत, मेणबत्त्या व अगरबत्त्या ठेवण्यात याव्यात, आणि त्याचबरोबर दारक आणि दारिका यांनी एकमेकांना घालावयाचे पुष्पहार जवळ ठेवावेत.

संस्कार विधी संपन्न करणे.

११. (१) या अधिनियमान्वये बौद्ध विवाह (मंगल परिणय) हा परिशिष्ट पाच मध्ये नमूद संस्कार विधी प्रमाणे संपन्न होईल.

(२) साधारणपणे असा बौद्ध विवाह पुढीलप्रमाणे संपन्न होईल,-

(अ) मंगल परिणय पार पाडण्यासाठी बौद्ध व्यक्ती धम्म संस्कार मंचावर उपस्थित राहील. दारिका पांढरी साडी व दारक पांढरा पोशाख परिधान करून धम्म संस्कार मंचाच्या मध्यावर बसेल.

(ब) दारक व दारिका भगवान बुद्धांना व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खाली वाकून नमन करतील, त्यांच्या प्रतिमेस किंवा पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती प्रज्वलीत करतील व त्यांना नमन करून त्यांच्यापुढे दोन्ही हात जोडून उभे राहतील.

(क) बौद्ध विवाहाच्या (मंगल परिणयाच्या) स्थळावर जमा झालेल्या सर्व निमंत्रित पाहुणे मंडळी, आप्तेष्ट, नातेवाईक आणि समाजातील व्यक्ती यांच्या उपस्थितीत बौद्ध व्यक्ती मंगल परिणय पार पाडतील.

(ड) दारक व दारिका एकमेकांना पुष्पगुच्छ किंवा पुष्पहार प्रदान करून एकमेकांचा सत्कार करतील. त्याचवेळी उपस्थित व्यक्ती टाळ्या वाजवून दारक आणि दारिकेस त्यांच्या भावी जीवनाच्या मंगल कामनेच्या स्वरूपात आशिर्वाद देतील.

(इ) बौद्ध विवाह संपन्न करणारा व्यक्ती त्यानंतर विवाह संपन्न झाला असे घोषित करतील.

परंतु, परिशिष्ट पाच मध्ये दिलेला क्रमानुसार किंवा पद्धतीनुसार विवाह विधी पार न पाडता असा विधी बौद्ध परंपरेनुसार, रितीरिवाजानुसार आणि बौद्ध विवाह संपन्न करणाऱ्या बौद्धाच्या पद्धतीने केलेला बौद्ध विवाह हा अवैध असणार नाही.

परंतु असे की, बौद्ध धम्माच्या सामाजिक, भौगोलिक किंवा पारंपारिक बौद्ध पद्धतीने संपन्न केलेला विवाहसुद्धा अवैध असणार नाही.

(३) वरील कलमान्वये कुठल्याही पद्धतीने बौद्ध विवाह संपन्न झालेला असेल तर अशा परिस्थितीत दारक आणि दारिका यांनी परिशिष्ट चार अन्वये विवाह विधी संपन्न करणाऱ्या बौद्धाकडून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

(४) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी बौद्ध व्यक्ती यांची विवाह पद्धती नियमांद्वारे विहित करण्यात येईल.

नियम करण्याचे अधिकार. १२. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहपुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्यानियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि तशा आशयाचा आपला निर्णय, राजपत्रात अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल, किंवा, यथास्थिती, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्यानियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिगाह्यतेस बाध येणार नाही.

या अधिनियमाच्या तरतुदी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याला पुरक असणे. १३. या अधिनियमाच्या तरतुदी, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींना पुरक असतील आणि त्या न्यूनकारी असणार नाहीत.

अडचणी दूर करण्याचे अधिकार. १४. (१) या अधिनियमाच्या तरतूदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप, राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट

वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

परिशिष्ट क्र. १

## प्रतिबंधित नाती

भाग – १

१. आई, २. वडिलांची विधवा (सावत्र आई) ३. आईची आई ४. आईच्या वडिलांची विधवा (सावत्र आई) ५. आईच्या आईची आई ६. आईच्या, आईच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी) ७. आईच्या वडिलांची आई ८. वडिलांची आई ९. वडिलांच्या वडिलांची विधवा (सावत्र आजी) १०. वडिलांच्या आईची आई ११. वडिलांच्या आईच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी) १२. वडिलांच्या वडिलांची आई १३. वडिलांच्या वडिलांच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी) १४. मुलगी १५. मुलाची विधवा १६. मुलीची मुलगी १७. मुलीच्या मुलीच्या मुलाची विधवा १८. मुलाची मुलगी १९. मुलाच्या मुलाची विधवा २०. मुलीच्या मुलीची मुलगी २१. मुलीच्या मुलीच्या मुलाची विधवा २२. मुलीच्या मुलाची मुलगी २३. मुलीच्या मुलाच्या मुलाची विधवा २४. मुलाच्या मुलीची मुलगी २५. मुलाच्या मुलीच्या मुलाची विधवा २६. मुलाच्या मुलाची मुलगी २७. मुलाच्या मुलाची विधवा २८. बहिण २९. बहिणीची मुलगी ३०. भावाची मुलगी ३१. आईची बहिण ३२. वडिलांची बहिण ३३. वडिलांच्या भावाची मुलगी ३४. आईच्या बहिणीची मुलगी.

खुलासा : या भागासाठी "विधवा" या शब्दात "घटस्फोटीत पत्नी" चा समावेश होतो.

भाग – २

१. वडिल, २. आईचा नवरा (सावत्र वडिल), ३. वडिलांचें वडिल, ४. वडिलांच्या आईच्या नवरा (सावत्र आजोबा), ५. वडिलांच्या वडिलांचे वडिल, ६. वडिलांच्या वडिलांच्या आईचा नवरा (सावत्र पणजोबा), ७. वडिलांच्या आईचे वडिल, ८. वडिलांच्या आईच्या आईचा नवरा (सावत्र पणजोबा),९. आईचे वडिल, १०. आईच्या आईचा नवरा (सावत्र आजोबा), ११. आईच्या वडिलांचे वडिल, १२. आईच्या वडिलांच्या आईचा नवरा (सावत्र पणजोबा), १३. आईच्या आईचे वडिल, १४. आईच्या आईच्या आईचा नवरा (सावत्र पणजोबा), १५. मुलगा, १६. मुलीचा नवरा, १७. मुलाचा मुलगा, १८. मुलाच्या मुलीचा नवरा, १९. मुलीचा मुलगा, २०. मुलीच्या मुलीचा नवरा, २१. मुलाच्या मुलाचा मुलगा, २२. मुलाच्या मुलाच्या मुलीचा नवरा, २३. मुलाच्या मुलीचा मुलगा, २४. मुलाच्या मुलीच्या मुलीचा नवरा, २५. मुलीच्या मुलाचा मुलगा, २६. मुलीच्या मुलाच्या मुलीचा नवरा, २७. मुलीच्या मुलीचा नवरा, २८. मुलीच्या मुलीच्या मुलीचा नवरा, २९. भाऊ, ३०. भावाचा मुलगा, ३१. बहिणीचा मुलगा, ३२. आईचा भाऊ, ३३.वडिलांचा भाऊ, ३४. वडिलांच्या भावाचा मुलगा, ३५. आईच्या बहिणीचा मुलगा.

खुलासा : या भागासाठी "नवरा" या शब्दात "घटस्फोटीत पती" चा समावेश होतो.

परिशिष्ट क्र. २

दारक/दारिका यांची घोषणा

साधा संकल्प किंवा घोषणा

मी ------------------(संकल्प करणाऱ्याचे नाव) महाकरुणिक तथागत गौतम बुद्ध व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करतो व असे घोषित करतो की, आयुष्यमान -------------------(दारक आणि दारिका यांच्या वडिलांचे नाव व आडनाव) व आयुष्यमती ----------------( दारक आणि दारिका यांच्या आईचे नाव) यांचे मुलगा व मुलगी (दारक आणि दारिका यांची नावे) यांनी एकमेकांचे जीवनसाथी होणे मान्य केले आहे.

दारक आणि दारिका यांची घोषणा

मी ------------------------------असे घोषित करतो की,

१. मी आज अविवाहित आहे (किंवा विधुर किंवा घटस्फोटीत)

२. मी बौद्ध धर्मिय आहे.

३. माझे वय ----------------वर्षे पूर्ण आहे.

४. मी -------------------- (दारक/दारिका) यांच्याशी प्रतिबंधित नात्यामधील नात्याने संबंधित नाही.

५. जर मी केलेले एखादे विधान खोटे आहे व ते विधान करताना ते खोटे आहे हे मला माहित आहे किंवा खरे आहे असा मला विश्वास असेल तर मी या अधिनियमांद्वारे मी शिक्षेला पात्र असेल.

स्वाक्षरी

दारक आणि दारिका

१. स्वाक्षरी २. स्वाक्षरी ३. स्वाक्षरी

उपरोक्त घोषणेवर माझ्या समक्ष स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

स्थळ :

दिनांक : बौद्ध विवाह (मंगल परिणय) संपन्न करणारी व्यक्ती

# परिशिष्ट क्र. ३

## बौद्ध विवाह (मंगल परिणय) ची नोंदवही

या नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठाला क्रमांक द्यावेत व त्याला स्थळप्रत असावी.

१. दारक/दारिका यांची नावे

२. वय

३. बौद्ध विवाहाची (मंगल परिणयाची) तारीख आणि वेळ

४. धर्म

५. मंगल परिणयाच्या वेळी दारक/दारिका यांचे वास्तव्याचे ठिकाण

६. वडिलांचे/पालकांचे पूर्ण नाव

७. दारक आणि दारिका यांच्या स्वाक्षऱ्या

८. तीन साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या

९. मंगल परिणय पार पाडणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी

१०. नोंदवही बाईंडिग केलेल्या पुस्तकाच्या स्वरुपात असावी

११. प्रत्येक पृष्ठावर पृष्ठ क्रमांक असावेत व त्या मंगल परिणय संस्थेचा त्यावर शिक्का असावा व त्यावर अधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी असावी

१२. ते स्थळप्रत स्वरुपात असणे आवश्यक आहे.

परिशिष्ट क्र. ४

## बौद्ध विवाह (मंगल परिणय) चे प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, -------------------

१. अनुक्रमांक -----------------दिनांक ------------

२. दारक आणि दारिका यांची नावे -----------

३. त्यांचे वय -------------

४. बौद्ध विवाह (मंगल परिणय) झाल्याचा दिवस ----------दिवस ---------वेळ व जागा ---------------

५. त्यांची स्थिती ---------------------

६. मंगल परिणयाच्या वेळी त्यांचे वास्तव्याचे ठिकाण -------------------

७. वडिलांचे /पालकांचे पूर्ण नाव

७. बुद्धिष्ट संस्कारांनुसार मंगल परिणय पार पाडला. या शुभप्रसंगी दोघांनी ही बौद्ध संस्कारानुसार एकमेकांना पती-पत्नी म्हणून स्वीकारले.

८. हा बौद्ध विवाह (मंगल परिणय) आमच्या उपस्थितीत पार पाडला.

स्थान -------------- नाव ------------- स्वाक्षरी -------------------

बौद्ध विवाह (मंगल परिणय) संपन्न करणारी व्यक्ती

## परिशिष्ट क्र. ५

## बौद्ध विवाह संस्कार विधी

### पंचांग प्रणाम

१. अरहं सम्मा समबुद्धो भगवा, बुद्ध भगवंत अभिवेदामि

२. स्वाक्खातो भगवता धम्मो, धम्मम नमस्सामि

३. सुपटिपन्नो भगवतो सावक संघो, संघ नम्मामि

४. बुद्ध नमामि, धम्म नमामि, संघम नमामि

### वंदना

१. वंदना

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम बुद्धासा

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम बुद्धासा

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम बुद्धासा

२. त्रिसरण – (सरणातय)

बुद्धं सरणं गच्छामि

धम्मं सरणं गच्छामि

संघं सरणं गच्छामि

दुतियंपि बुद्ध सरणं गच्छामि

दुतियंपि धम्मं सरणं गच्छामि

दुतियंपि संघं सरणं गच्छामि

ततियंपि बुद्ध सरणं गच्छामि

ततियंपि धम्मं सरणं गच्छामि

ततियंपि संघं सरणं गच्छामि

## ३. पंचशील

पानातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि

आदिन्ना दाना वेरमणी सिक्खापदं समादियामि

कामेसुमिच्छाचारा वेरमणी सिक्खापदं समादियामि

मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामि

सुरो मेरय मज्ज पमा दठाणा वेरमणी सिक्खापदं समादियामि

### बुद्ध पूजा

पुप्फ पूजा (फुलांनी केलेली पूजा)

वन्न गंधा गुनोपेतम एतम कुसूमा सनातातिम

पुजायामि मुनिन्दासा सिरी पदा सरोरुहे

पुजेमि बुद्धं कुसूमेना नेना पुनेना मेतना का होतू मोक्कहम

पुप्फ मितायति यथा इदं मि कायो तथा यति विनसा भवम

### प्रदीप पूजा (प्रकाशाने पूजा)

घनसारप्पदितेन दिपेन तमधंसिना

तिलोदुदिप सम्बुद्धं पूजयामि तमोनुदं

### धूप पूजा

गंध सम्मार युतेन धुपेनहं सुगंधिना

पुजाये पुजानिया तम पुजा न्हाजन मुत्तम

### सुगंधी पूजा

सुगंधी काय वदनं अनंत गुणगंधिना

सुरांधिना ह गंधेन पूजियामि तथागतं

### धातू पूजा

बुद्ध धम्म च संघं सुगत तनुभदा धातु वो धातु गब्भे

लंकाय जम्बुद्धीपे तिदस पुरवरे नागलोकेचे थुपे

सब्बे बुद्धस्स बिम्बे, सकल दसदिसे केसलोमादि धातु वंदे

वन्दामि चेतियं सब्ब सब्ब ठाणेसु पतित्थिम

सारिरिक धातु महाबोधी बुद्ध रुप सकलं सदा

## त्रिरत्न वंदना

इथि पी सो भगवा अरहं सम्मा सम्बुद्धो

विज्जा चरण सम्पनो/सुगतो लोकविदु अनुत्तरो

पुरिस धम्म सारथा◌ी, सत्था देव मनुस्सानं

बुद्धो भगवा ती बुद्ध याव जिवितं सरणं गच्छामि

नत्थि मे सरणं अय्यं बुद्धो मे सरणं वरम

ऐते न सच्च वज्जेन होतु मे जय मंगल

उत्तमंगेन वन्दे हं पादपसु वरुतमं

बुद्धो ये खलितो दोसो बुद्धो कमतु तं ममं

यं किंचि रतन लोके विज्जति विविधा पुथु

रतन बुद्ध सम नत्थि तस्मा सोन्थि भपन्नु मे

या सन्नि सुन्नो वर बोधी मुले

मार ससेनं महति विजत्वा

सम्बोधी मागच्छि अनंत भाणो

लोकोतमो तं पणमामि बुद्धं

## धम्म वंदना (धम्माला प्रणाम)

स्वाक्खातो भगवता धम्म सन्दिठ्ठिको अकालिको

एहिपास्सिको ओपनायिको पच्चतं

वेदितब्बो विज्जुहीनी

धम्म याव जिवित सरणं गच्छामि

नत्थिमे सरणं अज्ञ (अय्यं) धम्मो मे सरणं वरं

एतेन सच्चवज्जेन होतु मे जयमंगल

उत्तमगेन वन्दे हं धम्मं च दुविधं वरं

धम्मे यो खलितो दोसो

धम्मो स्वमतु तं मंमं

य किच्ची रतन लोके, विज्जनि विविधा प्रभु

रतन धम्मसमं नत्थिं तस्मा सोत्थि भवन्तु मे
'अठ्ठागिको अरियपथो जनानं
मोक्खप्पवेसा उजुको व मग्गो
धम्मो अयं सन्तिकरो पणितो
नियानिको तं पणमामि धम्म

**संघ वंदना (संघाला प्रणाम)**

सुपटिपन्नो भगवतो सावकसंघो
उजुपटिपन्नो भगवतो सावकसंघो
न्याय पटिपन्नो भगवतो सावकसंघो
सामिचि पटिपन्नो भगवतो सावकसंघो
यदिदं चतारि पुरिस युगानि अठ्ठ पुरिस पुगळा
येस भगवतो सावकसंघो
आहुतेय्यो पाहुनेय्यो दक्खिणेय्यो अंजली करानिय्यो
अनुतरं पुग्गक्खेत लोकस्साति
संघ यावं जिवितं सरणं गच्छामि
नत्थि मे सरणं अय्यं, संघो मे सरणं वरं
एतेन सच्च वज्जेन होतु मे जय मंगलं
उत्तमगेन वंदे हं संघं च तिविधोतमं
संघे यो खलितो दोसो संघो खमतु तं ममं
य किंचि रतन लोके विज्जति विविधा पुथु
रतन संघा सम नत्थि तस्मा सोत्थि भवन्तु मे
संघो विसुद्धो वरदक्खिणेय्यो
सन्तिद्रियो सबब्मलप्पहिनो
गुणेहिनेकेही समिद्धिप्तो
अनसवो तं पणमामि संघ

## भीमस्मरण

सकलं विज्जं विदुरज्जानं देवरुपं सुजिव्हं

निमल चक्खु गभिर घोसं

गौर वण्ण सुकायं

अभय चितं निभय कामं सुरत धम्म सुपेम

विरत रज्जं सुजननेतं

भीमराव सरामि भीमराव सरामि

भीमराव सरामि

## जयमंगल अष्टगाथा

बाहुं सहस्समभिनिम्मितसायुधन्त,गिरिमेखलं उदितघोरससेनमारं।

दानादि धम्मविधिना जितवा मुनिन्दो, त तेजसा भवतु ते जयमंगलानि।१।

मारातिरेकमभियुज्झित-सब्बरत्तिं,घोरं पनालवकमक्खमथद्धयक्ख।

खान्ति सुदन्तविधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंगलानि।२।

नालागिरि गजवरं अतिमत्तभूतं,दावग्गिचक्कमसनीव सुदारूणन्तं।

मेत्तम्बुसेकविधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवुत ते जयमंगलानि।३।

उक्खित्तखग्ग-मतिहत्थ सुदारूणन्त,धावं तियोजनपथं-गुलिमालवन्त।

इद्धिभिसंखतमनो जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंगलानि।४।

कत्वान कटठमुदरं इव गब्भिनीया, चिञ्चाय दुट्ठवंचन जनकायमज्झे।

सन्तेन सोमविधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंगलानि।५।

सच्चं विहाय मतिसच्चकवादकेतुं, वादाभिरोपितमनं अतिअन्धभूतं।।

पञ्ञापदीपजलिलो जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंगलानि।६।

नन्दोवनन्दभुजगं विवुधं महिद्धि, पुत्तेन थेरभुजगेन दमापयन्तो।

इद्धुपधेसविधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवुत ते जयमंगलानि ।७।

दुग्गाहदिठ्टिभुजगेन सुदठ्टहत्थं, ब्रम्ह विसुद्धि जुतिमिद्धि बकाभिधानं।

ञाणागदेन विधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंगलानि।८।

एतापि बुद्ध जयमंगल अठ्ट गाथा, यो वाचको दिनदे सरते मतन्दी

हित्वान नेकाविविधानि चुपद्दवानि, मोक्खं सुंखं अधिगमेय्य नरो सपञ्ञो।९।

## प्रतिज्ञा आणि कर्तव्ये

**प्रतिज्ञा**

अत्थेच धम्मेच कामेच नाथिचरामि

अत्थेच धम्मेच कामेच नाथिचरामि

अत्थेच धम्मेच कामेच नाथिचरामि

(स्पष्टीकरण – मी धार्मिक, सामाजिक, वैवाहिक जीवनातील नियम कधीही तोडणार किंवा मोडणार नाही.)

### वराची कर्तव्ये

माझी भगवना बुद्धांवर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर श्रद्धा आहे. माझा त्यांच्यावर विश्वास आह. या समारंभात उपस्थित असलेल्या व्यक्तींना मी साक्षीदार म्हणून स्वीकार करतो व त्यांच्यासमोर पाच शपथा घेतो व त्या शपथांचे आयुष्यभर पालल करीन असे वचन देतो.

१. सन्माननाय – मी माझ्या पत्नीचा सन्मान करील.

२. अवमाननाय – मी माझ्या पत्नीचा अवमान करणार नाही.

३. अनितिचरीयाय – मी अनीती व अनाचरापासून अलिप्त राहीन.

४. इसरिय वोस्सगेन – मी माझ्या पत्नीला अन्न धान्याने संतुष्ट ठेवीन.

५. अलंकारानु पदानेच – मी माझ्या पत्नीला अलंकारादि भूषणांनी संतुष्ट ठेवीन. (तसेच मी माझ्या पत्नीला सुखात तसेच दु:खात समानतेने वागवेन)

मी पुन्हा वचन देतो की, मी आज घेतलेल्या पाचही प्रतिज्ञांचे प्रामाणिकपणे पालन (आचरण) करील.

### वधूची कर्तव्ये

माझी भगवना बुद्धांवर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर श्रद्धा आहे. माझा त्यांच्यावर विश्वास आह. या समारंभात उपस्थित असलेल्या व्यक्तींना मी साक्षीदार म्हणून स्वीकार करते व त्यांच्यासमोर पाच शपथा घेते व त्या शपथांचे आयुष्यभर पालल करीन असे वचन देते.

१. सुसंविहिता कम्मनात – मी माझ्या घरातील सर्व मंडळींची उत्तम व्यवस्था ठेवीन.

२. येसम संघहीत योजना - मी माझ्या परिवाराशी सौजन्याने वागेन.

३. अनितीचारिनीय – मी अनीती व अनाचारापासून अलिप्त राहीन.

४. सब्बतं अनुरक्खनं - मी माझ्या पतीच्या संपत्तीचे रक्षण करीन.

५. सब्बकिच्चेसु - मी घरकामात आळस न करता दक्ष राहीन.

मी पुनहा वचन देते की,'मी वरील घेतलेल्या पाच प्रतिज्ञांचे प्रामाणिकपणे पालन (आचरण) करीन.

## मंगलसूत

### मंगलसूत

१. बाहू देव मनुसा च, चंगलानी अचिन्त्यायूम
आकांखा-मम सोथ्थानम, हही मंगला मुत्तमम

२. असेवन चा बालनम, पंडीतनम चा सेवन
पुजा चा पुजा-नियानम, इतम मंगला मुत्तमम

३. पतिरुपम-देस वासे चा, पुब्बे का कात-पुज्जाता
अत्त सम्मा पनिधि चा, इतम मंगला मुत्तमम

४. बहु सच्चान्च सिप्पन्स, विनयो चा सुसिखितो
सुभासिता चा या वाचा, इतम मंगला मुत्तमम

५. माता पिता उपाथ्थानम, पुत्ता दारास्सा संघहो
अनाकुला चा काम्मन्ता, इतर मंगला मुत्तमम

६. दनम चा धम्म-चरीया चा, नाटाकानन्चा संघहो
अनावाज्जनि कम्मानि, इतम मंगला मुत्तमम

७. आरती विरती पापा, मज्जा-पाना चा सज्जामो
अप्पा-मादो चा धम्मेसू, इतम मंगला मुत्तमम

८. गरावो चा निवातो चा, संतूथी चा कताज्जूता
कलेना धम्म सवनम, इतम मंगला मुत्तमम

९. खांती चा सवचास्साता, समन नन्चा दस्सनम
कलेना धमम सकच्चा, इतम मंगला मुत्तमम

१०. तपो चा ब्रह्मा चारियाचा, अरिया सच्चाना दस्सनम
निब्बाना सच्ची किरीयाचा, इतम मंगला मुत्तमम

११. पुत्तास्सा लोको धम्मेही, चित्तम यासा ना कमपति
असोकम विराजम खेमम, इतम मंगला मुत्तमम

१२. ईता-दिसानी कातवन, सब्बाथ्था मपराजिता

सब्बाथ्था सोथ्थीम गच्चन्ति, तम तेसम मंगला-मुत्तामान्ति

## सब्बसुख, धम्मपालन आणि आशिर्वाद

### सब्ब सुख गाथा

सब्बे सत्ता सुखी होंतु, सब्बे होंतु चा खेमिनो
सब्बे भाद्रानी पसंतु, मा कज्चि दुख्ख मागमा
यानिधा भूतानि समगतानि, भूम्मनि वा यानि वा अंतालिख्खे
सब्बेवा भूता समन भावांतु, अथोपा सक्काच्चा सुनांतु भासितम
तस्सा घ भूता निसामेथा सब्बे, मेत्तम करोथा मनुसिया पजाय,
दिवा चा रातोचा हरांति ये बालिम, तस्सा ही ने रख्खाथा अप्पामात्ता

### धम्मपालन गाथा

सब्ब पापरस अकरणं, कुसलस्स उपसम्पदा
सचित परियोदपणं, एतं बुद्धान सासनं
धम्मचरे सुचरित न तम दुचरितं चरे
धम्मचारी सुखं सेती अस्मी लोके परम्हिच
न तावता धम्म धरो, यावता बहू भासिती
योच अपस्मी सुत्वान, धम्म कायेन पस्सति
सबे धम्म धरो होति यो धम्म नप्प ज्जति

### आशिर्वाद व शुभेच्छा

भवतू सब्बा मंगलम रखांतू सब्बा देवता
सब्बा बुद्धानुभव्ना सदा सोथ्थी भवंतू ते
भवतू सब्बा मंगलम रखांतू सब्बा देवता
सब्बा बुद्धानुभव्ना सदा सोथ्थी भवंतू ते

## इच्छा

इच्छीतम पत्थितम तुयहम खिप्पमेवासमिज्झा तू
सब्बे पुरेंतू चित्ता संकप्पा चांदो पन्नरसो यथा
आर्युरोग्य समपति सागा समपति मेवच
तातो निब्बान समपति इमिन ते समिज्झंतू

## समापन गाथा

सब्बे सत्ता सुखी होंतु
सब्बे, होंतु चा खेमिनो
सब्ब, भद्राणी पस्संतु
मा कांच्ची दुख मा गामा